**रुपये 3 लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणाली लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती** 2012/**प्र.क्र.**273/**का.**39

**सामान्य प्रशासन विभाग,**

मंत्रालय, मुंबई 400 032

दिनांक : 18 डिसेंबर, 2014.

**वाचा -**

1. शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2010/प्र.क्र.34/39, दि.6 ऑगस्ट, 2010
2. शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दि.16 जानेवारी,2014.
3. शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दि.26 नोव्हेंबर, 2014

**प्रस्तावना :-**

शासनाच्या खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय दि. ६ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. या निर्णयानुसार रु.५० लाखापेक्षा जास्त किमतीच्या निविदांसाठी ई-निविदा प्रणालीचा वापर करणे अनिवार्य करण्यात आले होते. तद्नंतर दिनांक १६ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये ही मर्यादा रु. १० लक्ष करण्यात आली होती. त्यानंतर शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दि.26 नोव्हेंबर, 2014 अन्वये ही मर्यादा रुपये 3 लाखापर्यंत अधिक खर्चाच्या कामांना लागू करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित विभागांकडून वेगवेगळया विचारणा करण्यात येत होत्या. ई-निविदा प्रक्रियेची अधिक परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांना सविस्तर सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

शासकीय खरेदी प्रक्रिया जास्त पारदर्शक, परिणामकारक व गतिमान करण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) ई-निविदा प्रणालीचा वापर शासनाचे सर्व विभाग, सर्व शासकीय विभागाच्या अधिनस्त असलेले कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे (माहिती अधिकार कायदा अधिनियम 2005 मधील कलम 4 प्रमाणे) यांना बंधनकारक राहिल.सर्व शासकीय विभाग सध्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत उपलब्ध असलेली एनआयसी ई-निविदा प्रणाली व सिफी नेक्स टेंडर यांचा वापर करण्यात येत आहे. सर्व विभागांनी प्राधान्याने एनआयसी ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

शासकीय विभागा व्यतिरिक्त काही संस्था (ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे इत्यादी) सध्या इतर ई निविदा आज्ञावलीचा वापर करीत आहेत. या सर्व संस्थांना इतर ई निविदा आज्ञावली वापर करण्याची मुभा पुढे सुध्दा राहील. मात्र अशा आज्ञावलीची निवड पारदर्शकपणे करणे आवश्यक राहिल. सदर आज्ञावली सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रमाणित असणे आवश्यक आहे व त्या आज्ञावलीचा डेटा बॅकप (Data backup) ठेवण्याची जबाबदारी संबंधित विभागांची / संस्थांची राहिल.

२) रुपये 3 लाख ते 10 लाख या मर्यादेतील ई-निविदा करण्यासाठी ऑनलाईन ईएमडी दिनांक 1 एप्रिल, 2015 पर्यंत ऐच्छिक करण्यात येत आहे. मात्र दिनांक 1 एप्रिल, 2015 नंतर ऑनलाईन ईएमडी दाखल करणे बंधनकारक राहिल. तथापि, रुपये 10 लाख व अधिक खर्चाच्या ई-निविदांसाठी ऑनलाईन ईएमडी तात्काळ प्रभावाने बंधनकारक राहिल.

ग्रामविकास खात्याकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार, तालूका स्तराखालील अथवा ग्रामपातळीवर जेथे अजूनही 100 % स्टेट बॅन्क अथवा आयसीआयसीआय या बॅन्कांच्या शाखा नाहीत तेथे ऑनलाईन ईएमडी दिनांक 1 एप्रिल, 2015 पर्यंत ऐच्छिक करण्यात येत आहे. मात्र दिनांक 1 एप्रिल, 2015 नंतर ऑनलाईन ईएमडी दाखल करणे बंधनकारक राहिल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201412161435373711 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Validity unknown

Digitally signed by RAJESH MADANLAL AGGARWAL
Date: 2014.12.18 16:17:07 IST
Reason:

**(राजेश अग्रवाल)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

1. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
2. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
3. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
4. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
5. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
6. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
7. सचिव, राज्य निवडणूक आयोग (पत्राने),
8. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
9. सचिव, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई (पत्राने),
10. सचिव, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई (पत्राने),
11. महालेखापाल, महाराष्ट्र-1 (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
12. महालेखापाल, महाराष्ट्र-1 (लेखा परीक्षा), मुंबई
13. महालेखापाल, महाराष्ट्र-2 ( लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
14. महालेखापाल, महाराष्ट्र-2 (लेखा परीक्षा), नागपूर

15. अधिदान व लेख अधिकारी, मुंबई,
16. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
17. मुख लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
18. सर्व विभागीय आयुक्त,
19. सर्व जिल्हाधिकारी,
20. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
21. सा.प्र.वि. कार्यासन-39
22. सर्व मंत्रालयीन विभाग,
23. निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
24. निवड नस्ती.